


कै.सौ .शेषाबाई सीताराम मुंढे महाविद्यालयात संविधान दिवस साजरा

गंगाखेड - येथील कै . सौ .शेषाबाई सीताराम मुंढे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २६ नोव्हेंबर २०२४ हा दिवस 'संविधान दिवस' म्हणून साजरा करण्यात आला.

प्राचार्य डॉ. बालाजी ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. दयानंद उजलंबे यांची उपस्थिती होती. प्रारंभी उपप्राचार्य उपप्राचार्य डॉ. दयानंद उजलंबे यांच्या हस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक केंद्रे यांनी संविधान दिवसाचे महत्त्व सांगितले.

यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. अशोक केंद्रे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी परिश्रम घेतले.




OPPO Reno11 5G
2024.11.26 10:04


OPPO Reno11 5G
2024.11.26 10:06